# मुख्य कार्यालय, विरार

**विरार (प),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२२/०५/२०२६

***जनगणना २०२७ : घराघरांत पोहोचणाऱ्या सेवाभावी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेचा प्रेरणादायी सलाम***

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा असलेल्या घरयादी व घरगणना कार्याला वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली असून शेकडो प्रगणक व पर्यवेक्षक अत्यंत जबाबदारीने हे काम पार पाडत आहेत. “*अचूक जनगणना हीच सक्षम राष्ट्रनिर्मितीची पायाभरणी”* या भावनेतून कर्मचारी घराघरांत जाऊन नागरिकांची माहिती संकलित करत आहेत.

या कार्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी हर्षला राणे यांनी विविध भागांना भेट दिली. त्यांच्यासमवेत महानगरपालिकेतील मास्टर ट्रेनर डॉ.महादेव इरकर उपस्थित होते. त्यांनी नालासोपारा पूर्वेकडील संतोषभवन, धानीव, नगीनदासपाडा, पेल्हार आदी परिसरात जाऊन प्रगणक व पर्यवेक्षकांच्या कामाचा आढावा घेतला.

यावेळी अधिकारी वर्गाने कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामातील अडचणी जाणून घेतल्या तसेच जनगणनेचे कार्य हे केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून देशाच्या विकासाचे दिशादर्शक कार्य असल्याचे सांगितले. कठीण परिस्थितीतही प्रामाणिकपणे आणि समर्पण भावनेने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील कामासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

या पाहणीमुळे जनगणना कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात जनगणना कार्य अधिक गतिमान झाले आहे.